# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः29.06.2024** **वारःशनिवार**

---

1. महाराष्ट्र राज्याचा 2024-25 साठीचा अतिरिक्त अर्थसंकल्प विधानसभेत सादर. पेट्रोल आणि डिझेलवरचा मूल्यवर्धित कर राज्यभरात एकसमान. महिलांसाठी 'मुख्यमंत्री-लाडकी बहीण' योजनेसाठी 46 हजार कोटी रुपयांची तरतूद.
2. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावर राज्यसभेत चर्चा सुरू, लोकसभेत कामकाज स्थगित.
3. राष्ट्रीय परीक्षा संस्था अर्थात एनटीए च्या परीक्षा येत्या 21 ऑगस्ट आणि 4 सप्टेंबर रोजी होणार,
4. नागरी विमानवाहतुकीत भारत जगात तिसऱ्या क्रमांकावर
5. अमरनाथ यात्रेला आज पहाटेपासून पहलगाम आणि बालताल इथून सुरुवात आणि
6. महिला कसोटी क्रिकेटमध्ये भारताची विक्रमी कामगिरी; दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पहिल्याच दिवशी 525 धावा.

**अर्थसंकल्प**

महाराष्ट्र राज्याचा 2024-25 या आर्थिक वर्षासाठीचा अतिरिक्त अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी काल विधानसभेत सादर केला. महिला, शेतकरी, दुर्बल घटक आणि युवकांच्या हिताला प्राधान्य देणाऱ्या या अर्थसंकल्पात एकूण खर्चासाठी 6 लाख 12 हजार 293 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यात महसुली जमा 4 लाख 99 हजार 463 कोटी रुपये; तर महसुली खर्च 5 लाख 19 हजार 514 कोटी रुपये अपेक्षित आहे. महसुली तूट 20 हजार 51 कोटी रुपये, राजकोषीय तूट 1 लाख 10 हजार 355 कोटी रुपये आहे. विधानपरिषदेत अर्थराज्यमंत्री दीपक केसरकर यांनी अर्थसंकल्प सादर केला.

महिलांसाठी या अर्थसंकल्पात विशेष योजना प्रस्तावित असून 21 ते 60 वयोगटातल्या महिलांसाठी 'मुख्यमंत्री-लाडकी बहीण' योजना यावर्षीच्या जुलैपासून लागू होणार आहे. त्याकरता दरवर्षी 46 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पात्र कुटुंबांना दरवर्षी तीन गॅस सिलिंडर्स मोफत देणारी मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनाही जाहीर करण्यात आली आहे. ओबीसी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील मुलींना चालू शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी, स्थापत्यशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, वैद्यकीय, तसंच शेतीविषयक सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक आणि परीक्षा शुल्काची संपूर्ण प्रतिपूर्ती देण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. यावर्षी 25 लाख महिलांना लखपती दीदी करण्याचं उद्दिष्ट राज्य सरकारनं ठेवलं आहे.

**राज्यसभा-चर्चा**

राज्यसभेत विरोधकांनी नीट परीक्षा गैरप्रकार प्रकरणी केलेल्या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर काल, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संसदेच्या संयुक्त सत्राला उद्देशून केलेल्या अभिभाषणावर चर्चा सुरू झाली. या चर्चेसाठी 21 तास राखून ठेवण्यात आले आहेत. कालच्या चर्चेदरम्यान भारतीय जनता पार्टीनं कॉंग्रेसवर टीका केली. कॉंग्रेस पक्ष सत्तेवर असतो, तेव्हा तेव्हा राज्यघटना धोक्यात असते असा आरोप करण्यात आला. राज्यघटनेच्या प्रास्ताविकेत बदलांसह अनेक उदाहरणं देण्यात आली.

दरम्यान, लोकसभेत विरोधक नीट मुद्द्यावर चर्चेसाठी ठाम असल्यानं झालेल्या गोंधळामुळे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. काल कामकाज सुरू झाल्यावर लगेचच विरोधकांनी इतर सर्व कामकाज रद्द करून नीटबाबत चर्चेसाठी स्थगन प्रस्ताव मांडला. अध्यक्ष ओमप्रकाश बिर्ला यांनी, राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबाबत धन्यवाद

प्रस्तावाच्या दरम्यान स्थगन प्रस्तावाला परवानगी देता येत नाही असं स्पष्ट केलं. विरोधी सदस्यांनी घोषणा सुरूच ठेवल्या, तेव्हा अध्यक्षांनी सदस्यांना लोकांनी लोकसभेत गोंधळ घालण्यासाठी नव्हे तर चर्चेसाठी पाठवलं आहे, असं सुनावलं. मात्र, गोंधळ कायम असल्यानं अध्यक्षांनी कामकाज सोमवारपर्यंत स्थगित केलं.

**<u>एनटीए</u>**

यूजीसी नेट जून 2024 परीक्षेच्या नव्या तारखा राष्ट्रीय परीक्षा संस्था अर्थात एनटीए नं काल जाहीर केल्या. आता या परीक्षा येत्या 21 ऑगस्ट आणि 4 सप्टेंबर रोजी होणार आहेत. एनटीए नं गेल्या 18 जून रोजी झालेली परीक्षा गैरप्रकार झाल्याचं उघडकीस आल्यामुळे रद्द केली होती. गैरव्यवहारांच्या पार्श्वभूमीवर सतर्कता बाळगण्यासाठी पुढे ढकललेली सीएसआयआर - यूजीसी नेट संयुक्त परीक्षा आता 25 ते 27 जुलै रोजी होणार आहे. ही परीक्षा विज्ञानशाखेतल्या पी एचडी प्रवेशासाठी घेतली जाते.

शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमासाठी घेतली जाणारी राष्ट्रीय सामायिक प्रवेश परीक्षा एनसीइटी 10 जुलै रोजी होणार असूनआयुष अभ्यासक्रमाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी होणारी परीक्षापूर्वनियोजित तारखेला म्हणजे 6 जुलै रोजी होईल असं एनटीए नं सांगितलं आहे. अधिकमाहिती एनटीए च्या www.nta.ac.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**<u>विमान-वाहतूक</u>**

देशांतर्गत विमानवाहतुकीत भारत जगातील तिसरा देश ठरला आहे. अमेरिका आणि चीननंतर भारतानं हा मान मिळवला आहे. ऑफिशिअल एअरलाइन गाइड म्हणजे ओएजी या विमानवाहतुकीबाबत विश्लेषण करणाऱ्या संस्थेनं ही माहिती दिली आहे. प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता, इंडिगो आणि एअर इंडियासारख्या कंपन्यांनी त्यांच्या ताफ्यात वाढ केल्यामुळे भारताचं स्थान पुढे गेल्याचं नमूद करण्यात आलं आहे.

भारतात विमानांमधील आसनांची क्षमता एप्रिल 2014 मध्ये 79 लाख होती, ती एप्रिल 2024 मध्ये एक कोटी 55 लाख इतकी झाल्याचं ओएजीनं म्हटलं आहे. त्यामुळे 97 लाख आसनांची क्षमता असणाऱ्या ब्राझिलला भारतानं मागं टाकून तिसरा क्रमांक मिळवला आहे. दरम्यान, दिल्लीला येणाऱ्या आणि जाणाऱ्या विमानांच्या प्रवासीभाड्यांमध्ये अनैसर्गिक वाढीबाबत देखरेख ठेवावी आणि असा कोणता प्रकार आढळून आल्यास कारवाई करावी अशा सूचना विमानवाहतूक मंत्रालयानं दिल्या आहेत.

**<u>पेन्शन</u>**

केंद्र सरकारनं कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी योजनेतील तरतुदींमध्ये बदल केला आहे. ज्या कर्मचाऱ्यांची सेवा सहा महिन्यांपेक्षा कमी राहिली आहे, त्यांनाही या योजनेतील विथड्रॉअल बेनिफिट म्हणजे रक्कम काढण्याची सुविधा त्यामुळे मिळणार आहे. सेवा पूर्ण होण्यासाठी सहा महिन्यांपेक्षा कमी काळ असताना या योजनेतून बाहेर पडणाऱ्या सात लाख कर्मचाऱ्यांना या बदलांचा फायदा होणार आहे.

**<u>टेलिफोन-क्रमांक</u>**

'दूरसंचार मोबाईल क्रमांक हस्तांतर नियमन नववी दुरुस्ती 2024' हा कायदा एक जुलैपासून अमलात येणार आहे. त्या अंतर्गत बनावट सिमचा वापर करून किंवा ते बदलून मोबाईल क्रमांकांचं हस्तांतर करण्याला आळा घालण्यात येणार आहे. युनिक पोर्टिंग कोड किंवा यूपीसी म्हणजे विशेष हस्तांतर क्रमांकासाठीची विनंती नाकारण्याची सुविधा नवीन कायद्याअंतर्गत देण्यात येणार आहे. तसंच सिम बदलल्यानंतर सात दिवसांच्या आत यूपीसीसाठी विनंती आल्यास तो न देण्याचीही तरतूद करण्यात आली आहे.

**<u>अमरनाथ यात्रा</u>**

52 दिवसांच्या अमरनाथ यात्रेला आज पहाटे पहलगाम आणि बालताल या दोन्ही ठिकाणाहून सुरुवात झाली.काश्मीर खोऱ्यातून प्रवासमार्ग असलेल्या या यात्रेसाठी चोख सुरक्षाव्यवस्था तैनातकरण्यात आली आहे. तत्पूर्वी काल

जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांच्या उपस्थितीत श्रीनगर इथं अमरनाथ यात्रेकरुंचं स्वागत करण्यात आलं. अमरनाथ यात्रा सुरळीतपणे पार पडण्यात जम्मू काश्मीरमधल्या नागरिकांचं योगदान मोलाचं आहे, असं सिन्हा यावेळी म्हणाले. दरम्यान, सुमारे 4 हजार यात्रेकरुंचा दुसरा जत्था जम्मूतल्या भगवती नगर यात्री निवासातून आज पहाटे काश्मीरकडे रवाना झाला.

**अमली पदार्थ**

पुण्यातील अमली पदार्थ सेवन प्रकरणी पोलिसांनी तीन अमली पदार्थ विक्रेत्यांना अटक केली आहे. त्यातील एकजण नायजेरियन तर दोन पुण्यातील आहेत. यातल्या एका आरोपीने L3 हॉटेलच्या पार्टीमध्ये ड्रग्स पुरवले होते. L3 बारवर झालेल्या कारवाईमध्ये आतापर्यंत 13 जणांना अटक केली आहे.

**मंगोलिया निवडणूक**

मंगोलियात सत्ताधारी पक्ष मंगोलियन पीपल्स पार्टीनं संसदीय निवडणुकीत विजय मिळवला आहे. प्रारंभिक निकालांनुसार 126 पैकी किमान 68 जागा आपल्या पक्षाला मिळाल्या आहेत, असं पक्षाचे अध्यक्ष आणि पंतप्रधान ओयन एर्देन लुसानमस्राई यांनी वार्ताहरांना सांगितलं. कागदी मतपत्रिकांची मोजणी झाल्यानंतर निवडणुकीचे अधिकृत निकाल जाहीर होतील. मंगोलियामध्ये संसदेचं एकच प्रतिनिधीगृह आहे.

**क्रीडायोग**

योगाचा आशियाई क्रीडा स्पर्धेत समावेश करण्याच्या निर्णयाचं केंद्रिय युवक कल्याण आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी स्वागत केलं आहे. भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्ष डॉक्टर पी टी उषा यांनी हा निर्णय घेतला आहे. यासंदर्भातलं पत्र त्यांनी आशियाई ऑलिम्पिक मंडळाचे अध्यक्ष राजा रणधीर सिंग यांना नुकतंच पाठवलं आहे.

**टी 20 विश्वकरंडक**

पुरुषांच्या 20 षटकांच्या आयसीसी विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेतला अंतिम सामना आज भारत आणि दक्षिण अफ्रिका यांच्यात बार्बाडोस इथं खेळला जाणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार रात्री 8 वाजता सामना सुरू होईल. अंतिम फेरीत पोहोचलेल्या दोन्ही संघांनी स्पर्धेत आतापर्यंत एकही सामना गमावलेला नाही. भारतीय संघाचे प्रशिक्षक म्हणून राहुल द्रविड यांचा हा शेवटचा सामना असणार आहे.

**महिला क्रिकेट**

भारत आणि दक्षिण अफ्रिका यांच्यात सुरू असलेल्या महिलांच्या क्रिकेट कसोटी सामन्यात काल पहिल्या दिवशी भारताच्या 525 धावा झाल्या आहेत. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतलेल्या भारतीय महिला संघानं कसोटी सामन्यात एका दिवसात सर्वाधिक धावा करण्याचा नवा विक्रम केला आहे. याआधी 1935 मध्ये इंग्लंडच्या महिला संघानं एका दिवसात 431 धावा केल्या होत्या. कालच्या खेळात 194 चेंडूत द्विशतक झळकावणाऱ्या शेफाली वर्मानंही विक्रमी कामगिरी केली आहे. कसोटी सामन्यात सर्वात वेगवान द्विशतक झळकवण्याचा विक्रम आता शेफालीच्या नावावर नोंदवला गेला आहे. स्मृती मंधाना हिनं 149 धावा केल्या.

**हवामान**

नैऋत्य मोसमी पावसाची आगेकूच सुरू असून राजस्थान, पश्चिम उत्तर प्रदेश, हरियाणा, दिल्ली याराज्यांमधे मोसमी पाऊस दाखल झाला आहे. मध्य प्रदेश, छत्तीसगड, पश्चिम बंगाल,झारखंड, बिहार, उत्तर प्रदेशचा पूर्वेकडचा भाग आणि उत्तराखंडच्या काही भागातहीमोसमी पावसाला सुरुवात झाली आहे. कोकण, मध्य महाराष्ट्रासह हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, हरियाणा, चंदीगड, दिल्लीसह अन्य काही राज्यात मुसळधार पाऊस अपेक्षित असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. गुजरात,कर्नाटकची किनारपट्टी तसंच सिक्कीम आणि अरुणाचल प्रदेशमध्येही काही ठिकाणी जोरदारपावसाचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**